**ब्युरोक्रसी-**

ब्युरोक्रसी म्हणजे ‘निवडणुकीच्या माध्यमातून निवडले न जाणारे सरकारी अधिकारी ’ आणि ‘योजना आखणारे प्रशासकीय गट’. ऐतिहासिक दृष्ट्या ब्युरोक्रसी म्हणजे सरकारी प्रशासन जे विविध सरकारी खात्यातील अधिकाऱ्याकडून नियंत्रित होते. आधुनिक भाषेत ब्युरोक्रसी म्हणजे अशी प्रशासकीय व्यवस्था जी कोणतीही मोठी संस्था नियामित करते.

परंतु आजच्या काळात ब्युरोक्रसीचा अर्थ नकारत्मक मानला जातो. ही व्यवस्था गुंतागुंतीची, अकार्यक्षम आणि बदल न स्वीकारणारी आहे अशी तिच्याविषयी टीका आहे. भारतासह अनेक देशांतील साहित्यात ह्या व्यवस्थेच्या अकार्यक्षमतेची खिल्ली उडवलेली दिसून येते.

आधार: http://en.wikipedia.org/wiki/Bureaucracy